१०) उमेदवारांना कळविण्यात येते की, ज्या उमेदवारांना शारीरिक क्षमता चाचणी (PET) व मनोविश्लेषणात्मक चाचणी (Psychometric Test) आणि कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता मागास प्रवर्गातून बोलविण्यात आले होते, अशा उमेदवारांचे ऑनलाईन परीक्षेतील गुण (५०% गुणप्रमाण / Weightage) व शारीरिक क्षमता चाचणीचे (PET) गुण (५०% गुणप्रमाण / Weightage) एकत्रित केल्यास त्यांची निवड खुल्या प्रवर्गातून गुणानुक्रमे होऊ शकते. तसेच त्याच धर्तीवर मागास प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या तथापि, खुल्या प्रवर्गातून शारीरिक क्षमता चाचणीचे (PET) / कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची निवड गुणानुक्रमे मागास प्रवर्गातून होऊ शकते.

११) कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाच्या कागदपत्रे पडताळणीअंती "अतिरिक्त कागदपत्रे पडताळणी आवश्यक" शेऱ्याअंतर्गत दर्शविण्यात आलेल्या उमेदवारांचा समावेश निवड / प्रतिक्षा यादीत असल्यास, अशा उमेदवारांची "उंची" आणि "दृष्टी" याबाबत मा.जे.जे.रुग्णालय, मुंबई येथे पुर्न:पडताळणी करण्यात येणार आहे. सदरील अहवालानुसार उमेदवार पात्र ठरत असल्यास त्यांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. करीता, ज्या उमेदवारांचा समावेश "अतिरिक्त कागदपत्रे पडताळणी आवश्यक" यादीत आहे आणि त्यांचे नाव निवड / प्रतिक्षा यादीत समाविष्ट आहे केवळ अशा उमेदवारांनी मा.जे.जे.रुग्णालय, मुंबई यांना सादर करावयाचे पत्र प्राप्त करण्याकरीता खालील नमूद पत्त्यावर उपस्थित रहावे (फक्त निवड / प्रतिक्षा यादीतील उमेदवार) :-

**ठिकाण** :- उप महाव्यवस्थापक (मासं-सेप्र) यांचे कार्यालय, एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत, तळ मजला,
लेबर कॅम्प, धारावी रोड, माटुंगा (पुर्व), मुंबई-४०००१९

**(डॉ.नितीन वाघ)**
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती

C:\Users\00008232\Downloads\Notification Finalresult JSO.doc